**ठळक बातम्या**

- जागतिक हवाई वाहतूक उद्योगात भारताचं महत्त्व वाढलं असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- नागालँड विधानसभेतल्या ७ आमदारांच्या पक्षांतरप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस कायदेशीर पाऊल उचलण्याच्या तयारीत

- दहशतवाद विरोधी पथकाकडून ठाणे जिल्ह्यात १२ संशयितांना अटक

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी उद्या रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू आणि पंजाब किंग्ज यांच्यात लढत

**<><><><><>**

जागतिक हवाई वाहतूक उद्योगात भारताचं महत्त्व वाढलं आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. नवी दिल्लीतील भारत मंडपम इथे IATA अर्थात आंतरराष्ट्रीय हवाई वाहतूक संघटनेच्या ८१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते आज बोलत होते. जागतिक हवाई वाहतूक  उद्योगात भारत एक आघाडीची शक्ती म्हणून उदयाला येत आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले. ‘उडान’ योजना ही भारताच्या हवाई वाहतूक क्षेत्रातलं सुवर्णपान असून देशांतर्गत विमान वाहतूक क्षेत्रात भारताने जगात तिसऱ्या क्रमांकावर झेप घेतल्याचं त्यांनी सांगितलं.

पुढच्या पाच वर्षात देशात ५० विमानतळ विकसित करणार असल्याची घोषणा यावेळी नागरी विमान वाहतूक मंत्री के राममोहन नायडू यांनी केली. यावर्षीच्या एप्रिल महिन्यापर्यंत देशांतर्गत विमान वाहतुकीत १० टक्के वाढ झाल्याचं नायडू यांनी सांगितलं.

***(कालपासून सुरू झालेल्या IATA कार्यक्रमाची उद्या सांगता होईल. या कार्यक्रमादरम्यान, जगभरातील नेते भारताच्या विमान वाहतूक क्षेत्रात***

***झालेल्या उल्लेखनीय परिवर्तनाचे आणि देशाच्या सामाजिक-आर्थिक विकासात त्याच्या योगदानाचे साक्षीदार होतील, असं प्रधानमंत्री कार्यालयाने दिलेल्या निवेदनात म्हटलं आहे. IATA ची शेवटची वार्षिक सर्वसाधारण सभा ४२ वर्षांपूर्वी १९८३ मध्ये झाली होती.)***

**<><><><><>**

नागालँड विधानसभेतल्या सात आमदारांनी केलेल्या पक्षांतराला आव्हान देण्यासाठी अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सर्व पर्यायांचा विचार करत आहे, असं पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस ब्रिजमोहन श्रीवास्तव यांनी काल भोपाळ इथं बातमीदारांशी बोलताना सांगितलं. पक्षांतरविरोधी कायद्याखाली हे प्रकरण तपासलं जाईल, यासाठी शक्य ते कायदेशीर पाऊल उचललं जाईल, असं श्रीवास्तव यांनी सांगितलं. विधानसभा निवडणुकीत जनतेनं दिलेल्या जनादेशाचं रक्षण करण्यासाठी पक्ष वचनबद्ध आहे, असं ते म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वच्या सर्व सात आमदार सत्ताधारी नॅशनलिस्ट डेमोक्रॅटिक प्रोग्रेसिव्ह पार्टीत ३१ मे रोजी सामील झाले. एनडीपीपी ने युती धर्माचं उल्लंघन केल्याचा आरोपही राष्ट्रवादी काँग्रेसनं केला आहे.

**<><><><><>**

विद्यापीठं केवळ शिक्षणसंस्था आणि अभ्यासक्रम नियोजन करणारी संस्था नाही तर संशोधन, नवोन्मेष आणि स्टार्ट अप सुरू करणारी केंद्रं बनावीत, असं मत मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी व्यक्त केलं. नाशिकमधल्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या ‘चक्र’ या उत्कृष्टता केंद्राचं भूमिपूजन आणि संकेतस्थळाचं उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. ‘चक्र' च्या माध्यमातून संशोधन, नवोन्मेष आणि स्टार्टअपला बळ मिळेल, असंही ते म्हणाले. यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विद्यापीठाच्या १५० दिवसांच्या कृती आराखडा पुस्तिकेचं प्रकाशनही करण्यात आलं.

**<><><><><>**

नागपूर- मुंबई महामार्गावरच्या ७६ किलोमीटर लांबीच्या शेवटच्या टप्प्यातल्या समृद्धी महामार्गाचं उद्घाटन येत्या ५ तारखेला मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते होणार आहे. नाशिकच्या इगतपुरी ते ठाण्यातल्या आमणे यांना जोडणारा हा ७०१ किलोमीटर लांबीच्या हाय-स्पीड कॉरिडॉरचा शेवटचा टप्पा आहे. हा टप्पा पूर्ण झाल्यामुळे समृद्धी महामार्गावरुन आता नागपूर ते मुंबई थेट प्रवास करता येणार असल्याची माहिती राज्य रस्ते विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांनी दिली.

<><><><><>

नागपूरमधल्या एम्समध्ये बोन मॅरो म्हणजेच अस्थिमज्जा ट्रान्सप्लांट युनिट सुरु करण्यासाठी एनटीपीसी नं आर्थिक मदत दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या संकल्पनेला प्रतिसाद देत एनटीपीसी नं याबाबतच्या सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली आहे. या युनिटच्या स्थापनेमुळे रुग्णांना सिकल सेल, थॅलेसेमिया, कर्करोग आणि इतर गंभीर आजारांवर नागपूरमध्येच उपचार मिळणार असून त्यांना दिल्ली मुंबईसारख्या शहरांमध्ये जाण्याची गरज भासणार नाही.

<><><><><>

मुंबई मराठी पत्रकार संघ आणि श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक राज्यस्तरीय स्पर्धेत ‘हंस’ या दिवाळी अंकाला प्रथम पुरस्कार घोषित झाला आहे. एक लाख रुपये आणि सन्मानचिन्ह असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. ‘अंतरीचे प्रतिबिंब’ या दिवाळी अंकाला द्वितीय पुरस्कार तर ‘अक्षर’ या अंकाला तृतीय पुरस्कार घोषित झाला आहे. तसंच मुलांसाठीच्या दिवाळी अंकांच्या गटात ‘वयम’ या अंकाला प्रथम पुरस्कार घोषित झाला आहे.

<><><><><>

दहशतवादाशी संबंधित एका प्रकरणात महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकानं ठाणे जिल्ह्यात छापेमारी करून १२ संशयितांना अटक केली. दहशतवाद विरोधी

पथकानं साकिब नाचण, अकिब साकिब नाचण, अब्दुल लतीफ कासकर, कैफ नाचण, शाजील नाचण, फारक झुबेर मुल्ला यांच्यासह प्रतिबंधित संघटना सिम्मीच्या काही माजी पदाधिकाऱ्यांच्या घरांची आणि परिसराची झडती घेतली. झडती दरम्यान ६ जण त्यांच्या घरात आढळले नाहीत. ए टी एस नं पुढील तपासासाठी १२ जणांना अटक केली आहे.

<><><><><>

धुळे कृषी विभागाच्या पथकाने धुळे शहरात आज सकाळी खासगी बसगाड्या आणि वाहनांवर छापे टाकून २० लाख रुपये किमतीचं बनावट तसंच राज्यात प्रतिबंध असलेलं कपाशीचं बियाणं जप्त केलं आहे. पथकातल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी रात्रभर गस्त घालताना मिळालेल्या माहितीच्या आधारे वेष बदलून ही कारवाई तडीस नेली. हे बियाणं गुजरातमधून महाराष्ट्रात विक्रीसाठी आणलं जात होतं आणि त्यात बाराशे ते तेराशे पाकिटांचा समावेश होता.

<><><><><>

कृषी विभागाच्या पथकानं अमरावतीतून प्रतिबंधित एचटीबीटी बियाण्याची अडीच हजार पाकिटं जप्त केली आहेत. जप्त केलेल्या या बियाण्यांची किंमत २५ लाख रुपये आहे. गुजरातमधल्या अहमदाबादमधून अमरावतीमार्गे नागपूरला जाणाऱ्या खासगी बसच्या तपासणीत हा साठा आढळून आला. याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून अधिक तपास सुरु आहे. यापूर्वी कृषी विभागाच्या पथकानं जिल्ह्यात विविध ठिकाणी प्रतिबंधित एचटीबीटी बियाण्यासंदर्भात सहा कारवाया केल्या असून त्यापैकी ५ कारवायांमधे जप्त केलेला माल गुजरातमधून आल्याचं उघडकीला आलं आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत उद्या रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू आणि पंजाब किंग्ज यांच्यात अहमदाबाद इथल्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर अंतिम सामना होणार आहे. बेंगळुरू संघाचं नेतृत्व रजत पाटीदार याच्याकडे आहे तर पंजाब

किंग्जचं कर्णधारपद श्रेयस अय्यर याच्याकडे आहे. फलंदाजी आणि गोलंदाजी या विभागांमध्ये दोन्ही संघ समान आहेत. पंजाब संघाच्या फलंदाजीची भिस्त प्रियांश आर्य आणि प्रभसिमरन सिंग यांच्यावर असून त्यांच्यासोबत जोश इंग्लिस, नेहल वढेरा, शशांक सिंग फलंदाजीची धुरा सांभाळतील. दुसरीकडे बेंगळुरूकडून विराट कोहली, फिल सॉल्ट, रजत पाटीदार, लियाम लिव्हिंगस्टोन आणि जितेश शर्मा फलंदाजी करतील. विशेष म्हणजे २००८मध्ये सुरू झालेल्या आयपीएल क्रिकेट स्पर्धेत हे दोन्ही संघ एकदाही करंडक जिंकू शकलेले नाहीत. त्यामुळे दोन्ही संघांसाठी हा विजय महत्त्वाचा ठरणार आहे.

<><><><><>

अतिरिक्त गर्दी टाळण्यासाठी एलटीटी मुंबई ते मडगाव आणि हडपसर ते हिसार दरम्यान धावणाऱ्या विशेष रेल्वेगाडीच्या फेऱ्या वाढवण्यात आल्या आहेत. २६ मे पर्यंत अधिसूचित केलेल्या एलटीटी मुंबई ते मडगाव दरम्यान दर सोमवारी धावणाऱ्या साप्ताहिक रेल्वेचा कालावधी आता ९ जूनपर्यंत वाढवण्यात आला आहे. २५ मे पर्यंत अधिसूचित केलेल्या दर रविवारी धावणाऱ्या मडगाव-एलटीटी मुंबई साप्ताहिक रेल्वेचा कालावधी ८ जूनपर्यंत वाढवण्यात आला आहे.

२६ मे पर्यंत अधिसूचित केलेल्या हडपसर-हिसार साप्ताहिक रेल्वेचा कालावधी ३० जूनपर्यंत वाढवण्यात आला आहे. २५ मे पर्यंत अधिसूचित केलेल्या हिसार-हडपसर साप्ताहिक रेल्वेचा कालावधी २९ जूनपर्यंत वाढवण्यात आला आहे.

<><><><><>

आयआयटी कानपूरने आज जेईई ॲडव्हान्स परीक्षेचा निकाल जाहीर केला. result25.jeeadv.ac.in. या संकेतस्थळावर हा निकाल उपलब्ध असेल. आयआयटी आणि इतर समकक्ष तंत्रशिक्षण संस्थांमधे पदवीपूर्व अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ही परीक्षा आवश्यक असते.

<><><><><>

बीड इथं ट्रकनं ऑटोला धडक दिल्यामुळे झालेल्या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला. तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. बीड जिल्ह्यात माजलगाव-तेलगाव मार्गावर काल रात्री हा अपघात झाला.

<><><><><>

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज ७७ अंकाची घसरण झाली आणि तो ८१ हजार ३७४ अंकावर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ३४ अंकांची घसरण नोंदवत २४ हजार ७१७ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

येत्या दोन दिवसांत कोकणात काही ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

//<><><><><>//